# मानवनिर्मित तणाव

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. २८–१०–२००८
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

मानव ऐहिक दृष्ट्या समृद्धीच्या शिखराकडे झपाट्याने प्रवास करत असला तरी मानसिक दृष्ट्या तणावांच्या खाईत तेवढ्याच वेगाने चालला आहे. दुर्दैवाचा भाग म्हणजे याला कारणीभूत प्रामुख्याने मानवच आहे. जेवढ्या सुखासीनतेच्या वस्तू झपाट्याने वाढत आहेत, तेवढीच त्या वस्तुंची गरज वाढून त्या जीवनावश्यक होत आहेत. त्या वस्तुंचं अवास्तव महत्त्व वाढत आहे. त्यासाठी द्रव्यप्राप्ती वाढवणं भाग पडतं आहे. जास्तीतजास्त द्रव्यप्राप्तीसाठी नोकरीत उच्च पदावर जाण्याची अभिलाषा वाढली आणि त्यासाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता निर्माण झाली. याचा परिणाम म्हणजे बालवयापासूनच बालमनावर शिक्षणाचा ताण पडू लागला आणि इथूनच सुरुवात झाली ती मुलामुलांच्या शिक्षणासंबंधीच्या तुलनेला. पर्सेंटेजला असामान्य महत्त्व प्राप्त झालं आहे. त्यामुळे पाल्य आणि पालक दोघांच्याही मनावर टेन्शन येतं. नंतर शाळा, कॉलेजच्या ॲडमिशनचं टेन्शन. पुढे नोकरी न मिळणं, व्ही.आर.एस., सी.आर.एस. यांचं तर प्रचंड टेन्शन येतं.  कधी कधी ते टेन्शन उग्र रूपही धारण करतं. या चुरशीत आपण टिकू शकत नाही, येणाऱ्या प्रसंगाना तोंड देऊ शकत नाही या भावनेतून नैराश्य येतं. अशा नैराश्याच्या भावनेचा उद्रेक झाला, की आत्महत्येपासून  दुसऱ्याचा जीव घेण्यापर्यंत मानसिकता निर्माण होते. अगदी आत्मघाती हल्ल्यापर्यंत त्याची मजल पोहोचते. नैराश्य आणि इतरांच्या सत्ता आणि समृद्धीविषयीच्या द्वेषाची परिसीमा झाली, की अतिरेकी निर्माण होतात. यातूनच आत्मघाती हल्ले आणि शक्तीशाली स्फोट होतात. परिणामी, संपूर्ण समाजच तणावग्रस्त होतो. मानवाने मानवाच्या मानसिक समाधानासाठी शारीरिक सुखवस्तूंची रेलचेल केली, परंतु त्यातून केवळ हव्यासच वाढला. त्यातून समाधान न होणारी द्रव्यासक्ती वाढली. यातूनच करप्शन फोफावलं. अल्पवयातच शैक्षणिक तुलना होऊ लागली. ती पुढे सत्ता आणि समृद्धीच्या तुलनेपर्यंत पोहोचली. त्यामुळे नैराश्य येऊन द्वेष मत्सराने परिसीमा गाठली. त्याचा परिणाम म्हणून अतिरेकी निर्माण झाले. याचाच अर्थ जागतिक तणावग्रस्त अवस्था आणि उद्ध्वस्त मानसिकता निर्माण होण्याला प्रामुख्याने मानवच जबाबदार आहे. अर्थात ही मानसिकता बदलण्याची जबाबदारीही मानवाचीच आहे. बाह्य परिस्थिती बदलणं आपल्याला शक्य नसलं तरी त्याकडे बघण्याची नजर बदलून निश्चितच आपलं मन तरी आपण समृद्ध करू शकतो.